Network System A.M.C. दुरूस्ती व देखभाल

करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते कि, जिल्हा न्यायालय कोल्हापूर मुख्यालयातील Computer LAN System अखंडीत सुरू रहावी या करिता (Networking System with all components) यांची स्थानिक पातळीवर वार्षीक दुरूस्ती व देखभाल करार **Comprehensive-AMC (of Lan with all cable and 35 switches)** करणेचे आहे. तसेच इच्छुक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून सात दिवसाचा आत Networking System ची पहाणी करणे करिता मा. जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देउन सदरची निविदा भरणेचे आहे. तरी नोंदणीकृत तसेच इच्छुक सेवाधारकाकडून ही जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक १०/०६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत. यांची निविदाधारकानी नोंद घ्यावी. तरी ज्यांना निवीदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दि. १०/०६/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहचतील अशा रितीने निवीदा भरावेत.

हुकूमावरून,

सहा. अधिक्षक (वित्त),
जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर.

दिनांक - १६/०५/२०२५

Networking System A.M.C. दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

०१.	मोहरबंद निविदा हे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कोल्हापूर या नावाने दिनांक १०/०६/२०२५ इ रोजी कार्यालयीन वेळे पर्यत सुटटीचे दिवस वगळून किंवा त्यापुर्वी या कार्यालयास पोचतील अशा बेताने सादर कराव्यात त्यानंतर प्राप्त झालेले दरपत्रके स्विकारलया जाणार नाहीत.
०२.	कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे.
०३.	Network System A.M.C ची वार्षीक देखभाल/दुरूस्ती करार हे जिल्हा न्यायालय,कोल्हापूर या करिता मर्यादित राहील.
०४.	मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दुरध्वनी व्दारे Networking System A.M.C. दुरूस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल.

०५.	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील दुरूस्तकरते वेळी सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास दोन दिवसाचे आंत सदरहु सुटे भाग दुरूस्त करून जोडणे बंधनकारक राहील
०६.	निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतीम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो कोल्हापूर यांना राहतील.
०७.	वरील नमुद न्यायालयातील जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील Network System हे Lan with all cable and 35 switches याकरिता वार्षीक दुरूस्ती व देखभाल करार केली जाणार आहे. यांची नोंद घ्यावी.
०८.	दरपत्रक मंजुर झाल्यावर संबंधीतास ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करून दयावा लागेल व सदरहु ५००/- रूपयाचे बॉन्डपेपरचा खर्च संबंधीतास सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून एका वर्षाचा राहील.
०९.	वार्षिक देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की, (G.S.T Income Tax, etc) दरपत्रक मंजुर झालेल्या संबंधीतास व्यवसायीकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधीतास अदा करण्यात येणार नाहीत.
१०.	Networking System सर्वसमावेशक (Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्यांची विविध सुटे पार्ट करणे व दुरूस्त न झाल्यास बदलुन देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही.
११.	देयक हे त्रेमासिक पध्दतीने सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल.
१२.	देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल.
१३.	राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळुन देयक अदा करण्यात येईल.
१४.	एखादया निवीदाधारका विरुध्द खरेदी प्रक्रिये संदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निवीदा भरु नयेत, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जाईल.
१५.	पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निवीदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निवीदा भरणेची आहे. अन्य निवीदेचा विचार केला जाणार नाही.

<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>

१) संगणक विभागप्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते कि, सदरील निवीदा जिल्हा न्यायालय, कोल्हापुर च्या (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशीत करणेत यावी.

२) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर नोटीस बोर्ड.